आवक क्रमांक ४
दिनांक १२.६.८६
सही

जा.क्र.प्रा/प्राशि/अनुदान/फीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे. १ यांचे कार्यालय
दिनांक :

प्रति,

9 JUN 1986

शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर पुणे ४११ ००५

विषय:- महाराष्ट्रीय मंडळ, मराठी प्राथमिक शाळा पुणे.३७
अनुदान मिळणेबाबत.....

वरील विषया संबंधी कळविण्यात येते की, शासन शिक्षण व सेवायोजन विभागाकडील पत्र.क्र. व्हीएलएस १०८३/६५६२६/[४६९] प्राशि.३ दि. १४.५.८६ अन्वये या कार्यालयास असे आदेश देण्यात आले आहेत की, शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन व युवक सेवा विभाग क्र. व्हीएलएस १०७८/१०५३७३/[२११६] सात दिनांक १६.८.८० मधील शासकीय आदेशानुसार महाराष्ट्रीय मंडळाची मराठी प्राथमिक शाळा वीर सावरकर नगर, गुलटेकडी पुणे. ९ ही खाजगी प्राथमिक शाळा अनुदान मिळणेस पात्र असल्याने सदरहू खाजगी प्राथमिक शाळेस सन १९८४.८५ चे अनुदान तसेच त्या पुढील वर्षाचे अनुदान नियमानुसार अदा करण्यात यावे. मात्र अनुदान अदा करताना संबंधित शाळेतील मान्य शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन दिले जाते किंवा नाही याची तपासणी करून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(सही)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे. १ करिता

सौ. शालिनी प्र. भास्कर
१२-६-८६

प्रत :- मुख्याध्यापिका, महाराष्ट्रीय मंडळ, मराठी प्राथमिक शाळा पुणे-९ यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.